**Date : 22/5/24**

## विषय: पुनर्निर्माण प्रकल्पा ची वाटचाल.

सोसायटीतील काही सभासदांनी आपल्या पुनर्निर्माण प्रकल्पा च्या संबंधी सद्य परिस्थिती काय आहे अशी विचारणा केली आहे जेणे करून त्यांना काही बाबींचे नियोजन करता येईल जसे कॉर्पोरेशन ला भरावा लागणारा प्रॉपर्टी टॅक्स, घरातली डागडुजी, घराला रंग देणे वगेरे.
पुनर्निर्माण प्रकल्पा साठी सर्व प्रथम आपल्या जागे ची मालकी ब वर्गातून अ वर्गात करणे गरजेचे आहे. ते करीत असताना तीन गोष्टी अडथळे म्हणून समोर आल्या ज्याचा अंदाज आपल्याला पहिले नव्हता.

१. सध्याच्या १८ सभासदांनी पत्रकार नगर मधे फ्लॅट घेतांनाअगर गिफ्ट करतांना कलेक्टर ची परवानगी घेतली नव्हती.

२. १९७८ - ७९ साली आपल्याला फक्त १०० घरांची परमिशन होती पण आपण १०२ फ्लॅट्स बांधले आणि ते पुढे रेगुलराईज ही केले नाहीत.

३. समाज मंदिरा चा उपयोग आर्थिक लाभा करिता केला.
ह्या तिन्ही प्रश्नांवर तोडगा काढून तो सोडविण्याचा प्रयत्न पंच समिती, आपले नियोजित बिल्डर आणि सल्लागार करीत आहेत. ह्या कामात लोकसभेच्या निवडूनिके मुळे बराच उशीर लागत आहे. तरी आता पहिला प्रश्न जवळ जवळ सुटला आहे. इतर मुद्दे ही लवकर सोडविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.
तरी सर्व बाबींची पूर्तता होऊन आपण जागा सोडण्या पर्यंत डिसेंबर महिना उजाडेल असे दिसते. तेंव्हा सभासदांनी त्यांच्या विवेका प्रमाणे कुठल्या गोष्टी कधी आणि कश्या करायच्या ते ठरवावे.
मागल्या महिन्यात ९० फ्लॅट धारक सभासदांन पेकी बरेच सभासदांनी त्यांच्या फ्लॅट्स च्या डिझाईन्स वर त्यांचे अभिप्राय आणि सूचना बिल्डर च्या आर्किटेक्ट ला सांगितल्या. त्यावर विचार करून आर्किटेक्ट, बिल्डर (माहेश्वरी - न्याती) आणि आपले सल्लागार जून महिन्याच्या सुरवातीला एक दिवस ठरवून आपल्या सगळ्यां समोर परत एक सादरीकरण करणार आहेत.
डुप्लेक्स फ्लॅट धारकांना त्यांच्या घरांचे डिझाईन दाखविण्यात आले आहेत आणि त्यांच्या कडून त्यावर त्यांच्या सूचना घेण्यात येत आहेत. त्या सूचना / सुझाव बिल्डर / आर्किटेक्ट कडे पुढील कार्यवाही साठी पाठविण्यात येतील.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**